# व्यक्ती-वल्ली - अन्नपूर्णा: मीना देशपांडे

नमस्कार मंडळी,
आजचा माझा लेख माझ्या शाळेतील जिवलग मैत्रिणीवर आहे. मी तिला मीना पोफळी म्हणून ओळखतो. अमेरिकेत ती मीना देशपांडे म्हणून सर्वांना परिचित व प्रसिद्ध आहे. आता अभिमानाने मी तिला 'अन्नपूर्णा' म्हणतो. मला वाटतं त्याची फोड करण्याचे कारण नाही. आपण सवडीने हा लेख वाचावा व तृप्त झाल्यावर कळवावे. तुमचा प्रतिसाद हा मीनाचा सन्मानित बहुमान असेल... धन्यवाद.
आपला स्नेहांकित,
जयंत.

*Sharing is Caring...*

हा लेख लिहिण्यासाठी मला सुहास व अलका पै यांची मदत झाली. त्यांचा मी आभारी आहे.

---




*१) पन्नास वर्ष्यापूर्वी लग्नाच्या बेडीत सांपडलेले मीना व अविनाश देशपांडे... अविनाश देशपांडे याच्या सौजन्याने २) मीना देशपांडे... सुहास व अलका पै यांच्या सौजन्याने.*

१९६५ला मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर आम्ही बालमोहनकर कॉलेजचं शिक्षण घेण्यासाठी निरनिराळ्या मार्गाने वाटचाल करू लागलो होतो. वर्गात मुलं-मुली एका बांकावर बसविली जाणारी बालमोहन ही मुला-मुलींची शाळा होती. त्यामुळे भेदभाव नव्हता. हजेरी घेतांना प्रत्येक विद्यार्थ्यांचे नांव त्याच्या वडिलांसह उच्चारले जात होते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यांच्या वडिलांच्या नांवासह लक्ष्यात राहिले होते. परंतु, अकरा वर्ष एकत्र काढल्याने शाळेचा जो ‘बॉण्ड' होता त्यात अचानक खंड पडला होता. मात्र, कांही विद्यार्थी व विद्यार्थींनी विशिष्ट कारणांनी कायमच्या स्मरणात राहिल्या. त्यात प्रामुख्याने आमच्या बॅचची 'मीना पोफळी' होती. कारण, मीना दिसायला सुंदर, कर्तबगार, मोकळ्या स्वभावाची, आनंदी व आकर्षक व्यक्तिमत्वाची होती. तिच्या धीट व सडेतोड स्वभावामुळे बरेचसे तिला घाबरूनही असत. बालमोहनचे बहुतेक विद्यार्थी शिवाजी पार्क, दादर व माहीम येथे रहाणारे होते. शाळेचा संबंध सुटला तरी नातं तुटलं नव्हतं. आम्ही बालमोहनकर एकमेकांना अधून-मधून भेटत होतो. त्यावेळी एकमेकांची चौकशी होत असे. तेव्हढ्यात, आमच्या बॅचच्या ‘मीना पोफळीचं लग्न ठरलं’ व लनानंतर मीना अमेरिकेला जाणार अशी सणसणाटी व हादरा देणारी बातमी वाऱ्यासारखी पसरली. ‘बालमोहन व किंग जॉर्ज शाळेचे मीलन झाले’ या बातमीमुळे साऱ्या शिवाजी पार्कने हळहळ व्यक्त केली होती. शिवाजी पार्कला रहाणाऱ्या अनेक ‘हिरॉइन्स' होत्या पण, मीना ही शिवाजी पार्कचा ऍटमबॉम्ब होती..! लग्नानंतर मीना अमेरिकेत जाणार व ती दृष्टीआड होणार म्हणून दुःखही व्यक्त केलं जात होतं. कांहींनी तर मीना किती ‘नशीबवान’ म्हणून तिची स्तुती पण केली होती. आई-वडिलांनी योग्य वेळी लग्नाच्या बेड्या घातल्या असे खवचटपणे बोलणारे कांही आंबटशौकीन कमी नव्हते. कदाचित मीना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जात असेल असा ‘गैरसमजही' पसरला होता. परंतु, तसा गैरसमज निश्चित नसावा याची खात्री देणारेही कांही वस्ताद होतेच. सर्वात कहर म्हणजे, मीना अमेरिकेत गेली नसती तर, Miss India झाली असती असे उगाचच भकीत करणारेही त्यावेळी होते. मात्र, ही सहानुभूती केवळ प्रेमापोटी होती. अखेर मीना पोफळी अमेरीकेला गेली आणि सर्वांचा जीव शांत झाला

होता. असो. पुढे कांही वर्ष निघून गेली. दरम्यान आमच्या वर्गमित्रांच्या अधून-मधून भेटी-गांठी होत असत. आपापसात गप्पा मारतांना मीनाचा पत्ता लागला कां, ती अमेरिकेत कुठे असते, काय करते वगैरे वगैरे चांभार चौकश्या करणारे, मीनाला न विसरणारे व काळजी करणारे त्यात बरेच होते. इतकचं काय मलाही त्याची उत्सुकता असे. कारण, माझ्या सिनेसंगीत छंदामुळे मीनाचे वडील बाबासाहेब पोफळी हे सिनेसृष्टीत एक नामवंत आर्ट डायरेक्टर होते ते मला माहीत होते. त्यामुळे मला त्यांच्यासह त्यांच्या कलेबद्दल आदर होता. योगायोगाने त्यावेळी माझेही अमेरिकेत जाण्याचे विचार मनात घोळत होते. शिवाय, अमेरिकेत स्थायिक झालेल्या भावांमुळे एक दिवस जयंतही अमेरिकेला जाणार हे मी शाळेत असतांना सर्वांना माहीत होते. आणि तसंच झालं, मीही भारताला रामराम केला...



*१) अमेरिकेत आल्यावर प्रथम भेटीत, किचनमध्ये: कॅरॉल व अनिल गुप्ते, मीना, जयंत व वीणा कुळकर्णी... २) मीनाच्या घरी आम्ही वर्गमित्र: अनिल गुप्ते, माणिक गेहानी मी व मीना... ३) आम्ही शाळकरी मित्र. बसलेले डावीकडून: अनिल गुप्ते, वसुमती भातखंडे-देशपांडे व खानविलकर... मागे डावीकडून: श्रीपाद टिळक, कौमुदी जोशी-केतकर, राव, मीना वझे-नेरुरकर, मीना पोफळी-देशपांडे व मी...*

मुंबईच्या वातावरणात रमल्यामुळे मी अमेरिकेत आल्यावर कुटुंबासह न्यू यॉर्क शहरात स्थिरावलो होतो. प्रथम मराठी मंडळ गांठले आणि तेथे पडद्यामागे नियमित कामं करून ओळखी वाढवल्या. माझं नशीब असं की, कांही वर्षांनी म्हणजे, १९८७ मध्ये न्यू जर्सीत, बृहन महाराष्ट्र मंडळाचं तिसरं अधिवेशन झालं. त्याचा सिम्बॉल व स्मरणिका मी डिझाईन केल्यामुळे मला ते अधिवेशन व्यवस्थित अनुभवता आलं

होतं. ते अधिवेशन संस्मरणीय झालं होतं. मात्र अधिक स्मरणात राहिलं ते या प्रसंगामुळे... अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी जेवणाआधी माझा शाळेतील वर्ग मित्र अनिल-अन्या गुप्ते धांवत आला आणि म्हणाला, 'साल्या जयु, जेवायच्या आधी किचनमध्ये चल. नंतर बोलू...' अन्याला नक्कीच एक मुलीचा 'शोध' लागला असेल याची मला खात्री होती. आणि अगदी तसंच झालं. टॉमबॉय 'मीना पोफळी' चक्क कमरेला काष्टा बांधून साडीत किचनमध्ये भेटली होती..!

मंडळी, 'जग किती छोटं आहे' त्याचा अनुभव मीनाला पाहून आला होता. अन्याची तर भूकच नाहीशी झाली होती. मीनाला आम्ही पंचवीस वर्षांनंतर भेटलो होतो. त्यावेळी शाळेत असतांना मीना शाळा सुरु व्हायच्या आधी शाळेच्या बाजूला दोन रस्त्याच्या कोपऱ्यावर मुलांना-विद्यार्थ्यांना सांभाळण्याचे 'ट्रॅफिक गार्ड'चे काम आनंदाने करीत असे. त्या ड्रेसमधील ती मीना व या मीनात जमीन आस्मानाचा फरक दिसला. पण, स्वभावात बदल झाला नव्हता. लग्नानंतर मीना पोफळीची, मीना अविनाश देशपांडे झाली होती. अर्थात, मीनाचे गोरेपण, खदखदून हंसणे, खणखणीत आवाज व सुंदर रूप यात कांहीही बदल झाला नव्हता. फक्त मराठीबरोबर अधुन-मधून इंग्रजी भाषा बोलण्याचे ती धाडस करीत होती. हा 'परदेशीय' परंतु, चांगला फरक झाला होता. त्याचं कौतुक वाटलं होतं...




*१) The Capital Legacy या आपल्या स्वतःच्या Financial & Estae Planning कंपनीचे रुबाबदार मालक व दृष्ट लागणारं जोडपं, अविनाश व मीना देशपांडे... २-३) आपल्या वयाकडे दुर्लक्ष करून अजूनही एकमेकांवर प्रेमाने राज्य करणारे, Most Romantic Couple... सुहास व अलका पै यांच्या सौजन्याने.*

मीनाच्या भेटीने आनंद तर झालाच होता परंतु, कांही वर्षांतच जगाच्या ‘विश्व विद्यालयात’ मीनाने ‘स्वयंपाकघर, मदतनीस, सेवाधर्म व समाजशास्त्र’ या चार अत्यंत महत्वाच्या विषयात डॉक्टरेट पदवी मिळविली होती. नव्हे, येथील मराठी समाजाने ती डॉक्टरेट पदवी तिला सन्मानाने बहाल केली होती. हे निश्चितच अभिनंदनीय होतं. मीनाच्या नवऱ्याची, अविनाशची प्रथमच भेट झाली होती. तेव्हा खात्री झाली की, लग्नापूर्वीच त्याला ‘तिसरा डोळा’ होता. कारण, अविनाशने मीनाचे नांव बदलून ‘धनश्री' ठेवले होते. त्यामुळे त्याला किती ‘दूरदृष्टी’ होती त्याचाही पुढे प्रत्यय आला. मीना व अविनाश हे दृष्ट लागण्यासारखं जोडपं असून कालांतराने ते आमचे घनिष्ट मित्र बनले. आणि जुन्या रेशीम धाग्यांचा पीळ घट्ट झाला...

आज कुठलंही व कुणाचेही कार्य कुठेही असो, मीनाचा त्यात हौशेने सक्रिय भाग असतो. मग त्यात मित्रमंडळी, मंडळं, संस्था, परिषदं व अधिवेशनं इत्यादींचा समावेश येतो. प्रामुख्याने हजारों मंडळींच्या ब्रेकफास्ट पासून किचनचा संपूर्ण ताबा मीना एकट्याने सांभाळते. त्यामुळे मीनाला ‘अन्नपूर्णा’ असा योग्य 'किताब' सानंदाने दिला गेला आहे..! शिवाय गरीब, श्रीमंत, वृद्ध आजारी माणसांची सेवा करतांना त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून देणं हा आपला ‘जन्मसिद्ध हक्क’ आहे हे मीनाचं व्रत. मग त्यात कुठेही भेदभाव नाही. थोडक्यात, या सर्व सामाजिक कार्यात मीनाशिवाय पान हालत नाही. हे त्रिवार सत्य. आपल्या जवळच्या मित्रमंडळीत राज किंवा राजू या नांवाने ओळखला जाणाऱ्या अविनाशने आपला शैक्षणिक मार्ग बदलून ‘फायनान्शियल व इस्टेट प्लॅनिंगमध्ये’ व्यवसाय करून त्यात अभिनंदनीय यश मिळविले आहे. त्यातून निवृत्त होण्याची अजिबात इच्छा नाही. हे निश्चित भूषणावह आहे. सवड मिळेल तेव्हा अनुभवी मीनाही अविनाशला व्यसायात मदत करते. त्याचबरोबर अविनाश व मीनाची दानशूर वृत्ती त्यात अधिक भर घालणारी आहे यात दुमत नाही. वयोमानाने माणूस थकतो. शरीराच्या हालचाली मंदावतात. शारीरिक व्याधींना सुरुवात होते. हा जरी निसर्गाचा नियम असला तरी, त्याकडे दुर्लक्ष करून वर उल्लेख केलेल्या कार्यात मीनाची जराही कमतरता नाही. तसं पाहिलं तर, मीना व अविनाश यांचा कुटुंब परिवार-व्याप प्रचंड प्रमाणात आहे. या सर्वांची देखभाल,

उठबस व काळजी घेणं या देशात सोपं काम नाही. मीना व अविनाश ती आनंदाने घेताहेत. तसेच, या व्यापात चोवीस तास घरी येणारे पाहुणे हे वेगळे. थोडक्यात, अमेरिकेत आल्यावर मीनाने तिच्या सासू सासऱ्यांची, आई वडिलांची व देशपांडे-पोफळी या परिवारांची आत्मीयतेने नुसती देखभालच नव्हे तर, आजतागायत काळजी घेतेय. त्यामुळे देशपांडे-पोफळी या कुटुंबाचा ती सर्वेतो आधारस्तंभ आहे. त्यामुळे लहानापासून मोठ्यांपर्यंत मीना ही सर्वांची आवडती ‘ताई’-‘माई’ आहे.

मीना किती कर्तबगार आहे त्याचा हा नमुना: Meena is an integral part of The Capital Legacy, LLC. Basically, she organizes and helps the other members to maintain the infrastructure of the firm. She also acts as a liaison between the firm and clients which helps to strengthen the mutual relationships. Additionally, Meena is involved in social/charitable work that benefits the poor and needy people through other non-profit organizations.



*१) मराठी विश्व मध्ये वसंतोउत्सवात साजरा होणारा बाल कलाकारांचा कार्यक्रम... २) आमच्या बालमोहन शाळेच्या '६५ बॅचचे मुंबईत भेटलेले कांही विद्यार्थीमधल्या रांगेत डावीकडून दुसरा मी व पांचवी मीना... ३) आम्ही गप्पा मारतांना. डावीकडून: संध्या हजारे-देशपांडे, उल्हास गवंडे, मी, मीना व राजश्री भोंडवलकर...*

मीनाचं सामाजिक कार्य फार मोलाचं आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी मीनाने मराठी विश्व या मंडळासाठी लहान मुलांसाठी करमणूक व्हावी म्हणून ‘वसंतोत्सव' हा यशस्वी कार्यक्रम सुरु केला होता. त्याला बहर येऊन तो आजतागायत साजरा केला

जातो. त्याची झलक येथे पाहावी:
https://www.youtube.com/watch?v=UlHkZX-LNiA
तसेच, वय वाढत गेल्याची जाणीव झाल्यानंतर ५५ वर्ष ओलांडणाऱ्यांसाठी मीनाने इतर सवंगड्यांसह दूरदृष्टीने Club 55 सुरु केला. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. थोडक्यात, Club 55 सुरु करण्याची सुपीक कल्पना व प्रेरणा मीनाचीच. आज Club 55 फलद्रुप होऊन त्याचा व्याप खूप वाढला आहे. जवजवळ त्याचे शेंकडो सभासद आहेत. तो नुसता करमणूकीचा नसून एका यशस्वी ध्येयाने चालला आहे. त्यात उतार वयात लागणारे शारीरिक, वैद्यकीय, इन्शुरन्स व आर्थिक बाबींची काळजी घेतली जाते, प्रश्न सोडविले जातात. त्याची माहिती देण्यासाठी त्या-त्या व्यावसायातील अनुभवी सल्लागार-डॉक्टर्सना बोलावून वेळोवेळो त्यांच्या सभा घेतल्या जातात. या महत्वाच्या उपक्रमांशिवाय शारिरीक व मानसिक तंदरुस्तीसाठी, वर्षातून एकदा अमेरिकेबाहेर आनंददायी सहली काढल्या जातात. याचे श्रेय मीनासह Club 55 च्या सर्व तरुणांना जाते.




*१-२) Meena in action at Club 55... ३) Meena with her Club 55's close friends... From left: Mrs. Mona Vasudev, Mrs. Shobha Padte, Mrs. Shakun Panse, Meena, and Mrs. Alka Pai... सुहास व अलका पै यांच्या सौजन्याने.*

आज जर मीना हॉटेल व्यवसायात असती तर, तिने 'अन्नपूर्णा' म्हणून जागतिक कीर्ती मिळविली असती. मंडळी, माझ्या मते अजूनही ती वेळ निघून गेली नाहीये असं माझं मत. Passionate मीनाची स्तुती केली की, मीना विषय बदलून

म्हणते, 'जयंत, तू व वीणा आमच्या क्लब ५५ला कां येत नाहीत..?' असा प्रश्न मीना आम्हला विचारीत असते. म्हणजे, तिचा उत्साह कमी झाला नाहीये. परवा मीनाला फोन केला आणि म्हणाली, ‘अरे जयंत, तुझा विश्वास बसणार नाही. मी आत्ताच तुझी आठवण काढली आणि तुझा फोन आला. What a telepathy...!' मी मीनाला म्हटलं, ‘मीना हा दैवी चमत्कार नसून अन्नपूर्णा देवीचा चमत्कार आहे. आणि भाग्याने ती देवी मला पावली. पुण्य आपल्या दोघांच्या पदरी पडलं. अशीच माझी आठवण काढीत जा...’

मुलगी सरिता आणि मुलगा शंतनू अशी मीनाला दोन गुणी व कर्बगार मुलं आहेत. त्यामुळे मीना आता नातवंडात गुंतली आहे. या व्यापातून ९५ वर्षाच्या आईची सेवा करण्यात मीना चोवीस तास तत्पर असते. 'अरे जयंत तूच सांग, माझ्याशिवाय या सर्वांचं करणार कोण..? शक्तिपात होऊन अथवा माझ्या दुखण्याकडे बघून चालणारच नाही...' त्यामुळे ‘तू कशी आहेस हे मी मीनाला विचारीत नाही...' असो. मात्र एक गोष्ट खरी की, अविनाशचा मीनाला शारीरिक, मानसिक आणि आर्थिक आधार असल्याने आज मीना दोन पायावर आनंदाने उभी आहे. नव्हे, अविनाश-मीना हे खऱ्या अर्थाने देशपांडे व पोफळी संस्थानाचे भक्कम आधारस्तंभ आहेत. यात वाद नाही. तरीही मीनाला आज हांक मारली तर, कुठल्यातरी कार्यक्रमाच्या किचनमधूनच या अन्नपूर्णाचं प्रत्युत्तर येईल. याची खात्री बाळगा. मी पुढे जाऊन आनंदाने म्हणेन, येथील तमाम मराठी समाजाने मीना व अविनाशचा सानंदाने जाहीररीत्या गौरवपूर्वक सन्मान करावा ही मी इच्छा बाळगतो व मराठी विश्वानेही ही माझी हांक ऐकावी अशी मनापासून आशा व्यक्त करतो... असो.

माझ्या वाचनात आलं, ‘अन्नपूर्णा देवी’ हिन्दू धर्म में मान्य देवी-देवताओं में विशेष रूप से पूजनीय हैं. इन्हें माँ जगदम्बा का ही एक रूप माना गया है, जिनसे सम्पूर्ण विश्व का संचालन होता है...’ मीना त्याचाच एक अवतार आहे. अशा या ‘अन्नपूर्णा देवी’ला आणि माझ्या जिवलग मैत्रिणीला उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य लाभो ही सदीच्छा मी अभिमानाने व्यक्त करतो..!

आपला,

जयंत विठ्ठल कुळकर्णी.

jvkny1@gmail.com

*Sharing is Caring,*
*Courtesy is Contagious &*
*Timing is of Essence.*

टीप: मीनाचे वडील J. S. Pophali-Jageshwar Sheshrao Pophali  उर्फ बाबासाहेब पोफळी हे सुरुवातीला पृथ्वीराज कापूरकडे ‘पृथ्वी थेटरमध्ये’ कला निर्देशक म्हणून कामाला होते. नंतर त्यांनी हिंदी सिनेसृष्टीत पदार्पर्पण केले होते. ते किती महान कला निर्देशक-आर्ट डायरेक्टर होते त्या सिनेमांची थोडी झलक मी येथे देतो. राज कपूर व मधुबालाचा १९४७ मधील ‘दिल की रानी’, दिलीप कुमार व मीना कुमारीचा १९५३ मधील ‘फुटपाथ’, महिपाल व गीतांजलीचा १९६३ मधील ‘पारसमणी’, शशी कपूर व विजया चौधरीचा १९६३ मधील ‘हॉलिडे इन बॉबे’ व वैजयंतीमाला व जॉय मुखर्जीचा १९६४ मधील ‘इशारा’ इत्यादी. त्याशिवाय मुंबई टेलिव्हिजनसाठी 'स्वामी' आणि 'रामायण' या सिरीजचे आर्ट डारेक्शनही त्यांचेच होते. आणि बाबासाहेब हे उत्तम कवीही होते. परंतु, प्रसिद्धीविन्मुख असल्याने ते प्रकाशात आले नाहीत अथवा त्यांना योग्य ती प्रसिद्धी मिळाली नाही. याआधी बाबासाहेबांवर लेख लिहिण्यासाठी मी माझी लेखणी हाती घेतली होती ती अजूनही आहे. त्यांचं कार्य इतकं अफाट आहे म्हणून सांगू, ते प्रकाशित करण्यासाठी मला कांही महिने लागतील. आनंदाची गोष्ट म्हणजे, मीना व अविनाश यांनी मला संपूर्ण सहकार्य करायचं आश्वासन दिलंय. माझ्या हातून ते घडलं तर मलाच पुण्य लाभेल व अंधारातील 'अनमोल धन' बाबासाहेबांसह प्रकाशात येईल...

जाताजाता मीना किती पॉपुलर होती त्याची एक गंम्मत सांगतो. कांही वर्षांपूर्वी आम्ही मुंबईला गेलो असतां मीना व अविनाशही तेथे होते. त्यामुळे आमच्या शाळेतील वर्ग मित्रांनी शिवाजी पार्कच्या एका हॉटेल मध्ये अधिवेशनवजा

एक छोटासा सोहळा आयोजित केला होता. आम्ही सर्वांनी आमच्या व भाऊ मराठेने त्याच्या 'भाऊचा धक्क्यातील' कांही आठवणी सांगितल्या. आमची पार्टी रंगात आल्यावर वेटरने हळूच एक 'चिठी' मीनाच्या हातात दिली व कुणी दिली ते सांगितले. आम्हाला त्याचा थांगपत्ता नव्हता. नंतर तेथून निघाल्यावर मीनाने त्या 'चिठीची' हकीकत सांगितल्यावर आम्ही सर्व आनंदाने ओरडलो, 'मीना पोफळी झिंदाबाद..!' मंडळी, तो चिठी लिहिणारा एकेकाळी मीनाचा फॅन-चाहता होता. योगायोगाने तोही नेमका त्या हॉटेलमध्ये जेवायला आला होता. मीनाला त्याने ओळखले होते. आणि त्या दरम्यान त्याने मीनावर एक सुंदर कविता रचली होतो. ती निनावी कविता मीनाला खास त्याने पेश केली होती. तेव्हढ्यात, कवीराज अविनाशला स्फूर्ती आली आणि अविनाशने त्याच्या कांही कविता व शायरी पेश केल्या होत्या. त्यावेळी आम्हला अविनाशचे सुप्त गुण कळले की, वो भी एक शायर और कवी है..! शिवाय, शास्त्रीय संगीताची उत्तम जाण असलेला अविनाश हा उत्तम तबला नवाज आहे. आणि हो, कविराज अविनाशला त्याच्या कवितांचा 'काव्य संग्रह' प्रकाशित करायचा आहे. परंतु, कामाच्या प्रचंड व्यापापायी मनात असूनही गेली अनेक वर्ष त्याला मुहूर्त लागत नाहीये. लवकरच त्याला 'शुभ मुहूर्त' लागावा आणि तो प्रकाशित व्हावा अशी जबरदस्त इच्छा मी प्रकट करतो...

मीनाच्या प्रेरणेने पुढे सुहास व अलका पै यांच्या सहकार्याने जेव्हा Club 55 सुरु करण्याचा नारळ फोडला गेल्या नंतर त्याला कसा बहार आला ते आपण सर्वांनी अनुभवले आहे आणि अनुभवीत आहात. अंतराळात वावरणारा सुहास म्हणजे, नांवाप्रमाणेच करमणुकीची 'धमाल व्यक्ती' आहे. तो काय करीत नाही या प्रश्नाचे उत्तर सापडणं फार कठीण आहे. एकदा मीनाने कंटाळून (उशिरा कां होईना) अविनाशला उद्देशून 'मै क्या करूं राम मुझे बुढ्ढा मिल गया...' असा रडत आक्रोश केला. तो नेमका आमच्या स्वयंभू सुहासला ऐकायला गेला. आणि 'एका पैचा तमाशा' करणाऱ्या सुहासने वेळ न दवडता त्याची चावट लेखणी हाती घेतली. मीनाचे ते रडगाणे त्याने या विडंबनात्मक गाण्यातून ऐकविले होते. म्हणजे, सुहास काय उद्योग करतो त्याचा तुम्हाला अंदाज येईल. ते येथे एका...

https://www.youtube.com/watch?v=Qz6XmekSyKI

परंतु, Club 55 मध्ये सगळेच वयस्क असल्याने अविनाशावर त्याचा कांहीही परिणाम झाला नाही... असो.

---